कि.फौ.ख.क्र.– २४/२०१९
नुतन –वि–प्रफुल्ल
निशाणी क्र. ०७

**अर्जदाराचा उलट तपास गैरअर्जदारातर्फे श्री ए.आर. इटनकर यांच्या मार्फत शपथेवर पुन्हा सुरु**

३) हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र. २ चंद्रकला मेश्राम यांनी सन २०२१ मध्ये पोलिस स्टेशन, कोराडी येथे माझ्या व इतर ६ जणांविरुध्द तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर तक्रारीवरुन आमच्या विरुध्द भा.द.वि. कलम ३९७, ४२७, ३२३, ४५२, ३५४–बी, १४३, १४९ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणामध्ये दोषारोपपत्र दाखल झाले असुन सदर प्रकरण सत्र न्यायालय, नागपूर येथे प्रलंबित आहे. सदर प्रकरणामध्ये आम्ही फिर्यादीच्या घरावर हमला करुन तेथुन माझे लग्नात मिळालेले सामान व दागिणे नेले असा आरोप आमच्या सर्वांवर आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगते की हे आरोप खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही माझे सामान नेतांना फिर्यादीच्या घरातील सामान सुध्दा नेले असा आरोप आमच्यावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला अटक झाल्यानंतर फिर्यादीच्या नेलेल्या वस्तु आम्ही पोलिस स्टेशनमध्ये परत दिल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही फिर्यादीच्या घरी गेलो तेव्हा इतर लोग दारु पिऊन होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही गैरअर्जदारांना तेव्हा मारहाण केली व त्यामुळे गैरअर्जदाराचा हात सुध्दा मोडला होता. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी माझे गैरअर्जदाराच्या घरी कोणतेही सामान किंवा भेट वस्तु नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे व माझ्या घरच्यांची सुरवातीपासुनच क्रुरपणाची वागणुक होती.

४) हे म्हणणे खरे नाही की, मी या अर्जात केलेल्या मागण्या मिळविण्यासाठी पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदाराच्या घरी असलेल्या रिसेप्शनमध्ये माझे नातेवाईकांनी दारु पिऊन येवु नये असे गैरअर्जदार क्र. २ ने बजावले होते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र. २ ने असे बजावल्यामुळे माझ्या वडिलाच्या व माझ्या मनामध्ये त्यांच्या बद्यल राग होता. हे म्हणणे खरे नाही की, लग्नाच्या ८ दिवसानंतरच मी माहेरी जाण्याचा तगादा गैरअर्जदाराकडे लावला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या हट्टामुळेच मला गैरअर्जदारांनी दि. १७.०९.२०१७ रोजी माझे माहेरी पोहचुन दिले होते. हे

म्हणणे खरे नाही की, दि. ०२.१०.२०१७ रोजी गैरअर्जदार क्र. १ मला घेण्यासाठी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी मी गैरअर्जदार क्र. १ सोबत सासरी आली व दुस–या दिवशी लगेच निघुन गेली. हे म्हणणे खरे नाही की, दि. १८.१०.२०१७ रोजी गैरअर्जदार क्र. १ मला घ्यायला आला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी दसरा होता. हे म्हणणे खरे नाही की, सासरी आल्यावर मला माझ्या सासुने सोन्याचे मणी व चुलत सास–यांनी पुस्तके मला भेट दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार यांनी मला खुष ठेवण्यासाठी माझी काळजी घेतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, पहिल्या दिवाळीला सुध्दा मी माहेरी निघुन गेली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०५.११.२०१७ रोजी माझे वडिल माझ्या सासरी आले होते व त्या दिवशी मी व त्यांनी घरातील सामानाची फेकाफाक केली. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिल परत जात असताना गैरअर्जदार क्र. १ ची भेट झाली परंतु ते त्यांच्याशी बोलले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या माहेरच्या मंडळींनी गैरअर्जदारांना दबावात ठेवण्याचे प्रयत्न केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दबावामुळे गैरअर्जदार क्र. १ दि. ०८.११.२०१७ माझ्या सोबत घरच्यांपासुन वेगळे राहायला लागले. दि. २६.०१.२०१८ ला मी गरोदर असल्याचे मला माहित झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर गैरअर्जदारांनी माझी काळजी घेतली. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र. १ यांनी मला डॉ. सरिता नारनवरे यांच्याकडे उपचाराकरीता नेले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. २०.०२.२०१८ रोजी मी गैरअर्जदारांना न सांगता घराबाहेर निघुन गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेला मी माझा मोबाईल बंद करुन ठेवला होता. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र. १ ने माझ्या वडिलांना फोन केला असता त्यांनी त्यास शिवीगाळ केली होती. हे म्हणणे खरे नाही की, परत आल्यावर मी गैरअर्जदार क्र. १ सोबत भांडण केले होते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र. १ यांची संपत्ती इतर गैरअर्जदार घेतील यामुळे मी एकत्र परिवारात राहण्यास तयार झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी तगादा लावल्यामुळे गैरअर्जदार क्र. १ याने जुन २०१८ ला मला माहेरी सोडुन दिले. माझी प्रसुती दि. २६.०९.२०१८ रोजी झाली.

मी प्रसुतीच्या २ महिन्या अगोदर माझ्या माहेरी गेली होती. हे म्हणणे खरे नाही की, माहेरी असताना माझा फोन माझ्या वडिलांजवळ असायचा व ते त्यावरुन गैरअर्जदार क्र.१ ला शिवीगाळ करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, काही दिवसांनी गैरअर्जदार क्र. १ स्वतःच माझे माहेरी आला होता. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा माझ्या आई वडिलांनी गैरअर्जदार क्र. १ ला शिवीगाळ व मारण्याचा प्रयत्न केला होता. हे म्हणणे खरे नाही की, दि. १३.०७.२०१८ रोजी माझ्या वडिलांनी गैरअर्जदार क्र. १ ला शिवीगाळ केली होती. गैरअर्जदार क्र. १ चा वाढदिवस २३ जुलैला असतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ माझ्या माहेरी आला होता तेव्हा माझ्या आई वडिलांनी त्याला शिवीगाळ करुन त्याला घराबाहेर काढुन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०८.०८.२०१८ रोजी गैरअर्जदार क्र. १ मला पैसे आणुन देण्यासाठी आला होता. हे म्हणणे खरे नाही की, पैसे घेतल्यानंतर माझ्या वडिलांनी पुन्हा गैरअर्जदार क्र. १ ला शिवीगाळ केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार क्र. १ समोर नेहमीच माझ्या वडिलांच्या वागण्याचे समर्थन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, रिसेप्शनच्या दिवशी तुम्ही माझ्या वडिलांचा अपमान केला असे मी गैरअर्जदार क्र. १ ला म्हणत होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८.०८.२०१८ रोजी गैरअर्जदार क्र. १ मला भेटण्यासाठी व घेण्यासाठी आला होता. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०१.०९.२०१८ रोजी रामदासजी माझ्या वडिलांना समजावण्यासाठी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यांना सुध्दा माझ्या वडिलानी शिवीगाळ केली.

५) हे म्हणणे खरे आहे की, गरोदर असताना मी डागा हॉस्पीटल, नागपूर येथे उपचार घेत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या दवाखाण्यात गैरअर्जदार क्र. १ मला भेटायला येत होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रसुतीची माहिती गैरअर्जदारांना दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रसुतीनंतर गैरअर्जदार मला भेटायला आले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा सुध्दा माझ्या वडिलांनी गैरअर्जदार क्र. १ ला घराबाहेर काढुन त्याला धमकी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलीची तब्यते खराब झाल्यामुळे तिला ग्रीन हॉस्पिटलमध्ये भरती करण्यासाठी नेले होते. तेथे तिला भरती सुध्दा

केले होते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार तेथे मला भेटण्यासाठी आले होते. माझी मुलगी ग्रीन हॉस्पिटलमध्ये २ तास भरती होती. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार दवाखाण्यात पोहचल्यानंतर त्यांनी आम्हाला फोन केला होता. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र. १ चा फायदा घेवुन आम्ही गैरअर्जदाराशी क्रुरपणे वागलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारांचा बदला घेण्यासाठी मी दि. १५.१२.२०१८ रोजी राहण्यासाठी पुन्हा आले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी तेथे गेल्यावर गैरअर्जदार क्र. १ सोबत काही दिवस वेगळे राहीले. हे म्हणणे खरे नाही की, ४ ते ५ दिवसातच मी गैरअर्जदारांविरुध्द पोलिस स्टेशन, कोराडी येथे तक्रार देण्यासाठी गेले होते व पोलिसांना गैरअर्जदारांविरुध्द गुन्हा नोंदविण्यासाठी आग्रह केला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझी सदर तक्रार महिला सेल कडे पाठविली होती. हे म्हणणे खरे नाही की, कोराडी येथे गुन्हा नोंद न झाल्यामुळे मी कळमेश्वर येथील संरक्षण अधिका-याकडे तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, कळमेश्वर येथील संरक्षण अधिकारी माझे नातेवाईक होते. हे म्हणणे खरे नाही की, काल्पनीक घटना नमुद करुन मी सदर अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यावर कधीच कौटुंबिक हिंसाचर झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्र खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**श्रवणोत्तर स्वीकृत**

**समक्ष**

**दिनांक – २२/०२/२०२२.**
**कळमेश्वर**

**( एच.एन. पोले )**
**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**कोर्ट क्र.२, कळमेश्वर.**

**कि.फौ.ख.क्र.– २४/२०१९**
**नुतन –वि–प्रफुल्ल**
**निशाणी क्र. ०७**

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील साक्षपुरावा हे मुळ साक्षपुराव्या प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – आर.एस. डवरे (ग्रेड ३)